क्रमांक :-OAS-changes/सी.आर.१४/२०१८/तेवीस

# घोषणा

**विषय:- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) उमेदवारांच्या दाव्यांबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरीता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८चा अधिनियम क्रमांक ६२) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाकरीता जात प्रमाणपत्र व जात पडताळणीची कार्यपध्दती तसेच जात प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणीचे नमुने याविषयी शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये कार्यपध्दत विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासनाने विहित केलेल्या सवलती व आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता अर्जामध्ये निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवारांसाठी आवश्यक सुधारणा करण्यात आली आहे.

**२.** आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या खात्यामध्ये (Profile) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी यापूर्वी अराखीव (Open) असे नमूद केले आहे व सन २०१८चा अधिनियम क्रमांक ६२ अन्वये त्यांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाचा दावा करावयाचा आहे, अशा उमेदवारांना आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरील खात्यामधील वर्गवारी परस्पर बदलता येत नसल्याने अर्ज करताना अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर बाब विचारात घेऊन फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवारांना त्यांची वर्गवारी स्वत:च्या स्तरावर बदलण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याद्वारे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरील उमेदवाराच्या खात्यामधील अराखीव असे नमूद केलेला दावा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गामध्ये उमेदवारांना स्वत:च्या स्तरावर बदलता येईल. असा बदल करताना उमेदवाराला सद्यस्थितीत जातीच्या प्रमाणपत्राचा क्रमांक, जिल्हा, दिनांक इत्यादी तपशील नमूद न करता वर्गवारी तात्पुरत्या स्वरुपात बदलता येईल. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाचा दावा करताना उमेदवाराने महाराष्ट्रातील अधिवासाबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील अधिवासाचा दावा 'होय' असेल तरच संबंधित उमेदवाराला वयोमर्यादेतील व परीक्षा शुल्कातील सवलतीचा फायदा घेता येईल.

३. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवाराने शासनाकडून विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार जातीचे प्रमाणपत्र संबंधित यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेणे व त्याची आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरील त्यांच्या खात्यामध्ये नोंद घेणे आवश्यक राहील, याबाबत आयोगाकडून स्वतंत्रपणे यथावकाश सूचना देण्यात येतील.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- १५ डिसेंबर, २०१८

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग